दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक २३ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.१३ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# महाविकास आघाडीने फक्त ‘टाइमपास’ केला ना.सुधीर मुनगंटीवार यांची विरोधकांवर टीका

## चिमूर येथे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची सभा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गेली ५० वर्षे सत्ता उपभोगताना काँग्रेसने काहीच केले नाही. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळातही निव्वळ ‘टाइमपास’ केला. अडिच वर्षे निव्वळ विकासाच्या गप्पा करण्यात घालवली, अशी टीका राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच भाजप-महायुतीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केली. चिमूर येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ देशगौरव, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची सभा आयोजित करण्यात आली. यावेळी ना. मुनगंटीवार बोलत होते. ते म्हणाले, ‘महाराष्ट्राचा विकास का झाला नाही, असा प्रश्न काँग्रेसचे नेते तोंड वर करून विचारतात. त्याचे उत्तर काँग्रेसच्या कार्यकाळातच आहे. गेली ५० वर्षे काँग्रेसने महाराष्ट्रात राज्य केले. विकासाच्या नावाखाली काँग्रेसने केवळ भोपळा दिला. त्यामुळं विकासाचे ‘रिपोर्ट कार्ड’ विचारण्याचा कोणताही हक्क काँग्रेसच्या नेत्यांना नाही.’

**लाडक्या बहिणीला काँग्रेस घाबरली**

महायुती सरकारने लाडकी बहीण योजना आणली. त्यावेळ सगळ्या सावत्र भावांचे पोट दुखले. दीड हजार रुपये सरकारने बहिणींना देऊ नये म्हणून काँग्रेसकडून कोर्टात केस दाखल केली. पण त्याचा काहीच फायदा झाला नाही. महायुतीच्या योजनेला व्यापक प्रतिसाद मिळत असल्याचे दिसलं. त्यामुळे काँग्रेस घाबरली. आता त्यांचेच नेते बहिणींना तीन हजार रुपये देऊ असे सांगत आहेत, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

**शिवप्रतापदिनी संकल्पपत्र**

महायुतीने आपला वचननामा शिवप्रतापदिनी साजरा केला. ज्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा कोथळा बाहेर काढला होता. त्याच दिवशी महायुतीने संकल्पपत्र जाहीर केला आहे. राज्यातील महाभकास आघाडीच्या मागे जाऊ नका, असे आवाहनही ना. मुनगंटीवार यांनी केले.

**तर महाराष्ट्राचा व्यापक विकास होईल**

उद्धव ठाकरे यांनी आपल्या सरकारच्या काळात केवळ फेसबुक लाइव्ह केले. ते केवळ केंद्र सरकारवर टीका करताना दिसतात. ज्या लोकांमध्ये राज्य करण्याची क्षमता नाही, त्यांना कौल देऊ नका. केंद्रात विश्वगौरव, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे सरकार आहे. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आले तर डबल इंजिनमुळे महाराष्ट्राचा व्यापक विकास होईल, असा विश्वासही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

### विवाह नोंदणीसाठी साहेब मागतो हुंडा

# सातारा येथील विवाह नोंदणी कार्यालयात खाजगी एजंट,वरिष्ठांचा कानाडोळा

**सातारा । किरण अडागळे**

सातारा येथील विवाह नोंदणी कार्यालयात नोंदणी पद्धतीने विवाह नोंदणी करण्यासाठी खाबुगिरी बोकाळली असून, कार्यालयातील काही कर्मचारी विवाह नोंदणीसाठी खाजगी एजंट मार्फत अवाजवी रक्कम मागत आहेत. याबाबत वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची माहिती समोर येत आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी नवदाम्पत्यांकडून सहा ते सात हजार रुपये एवढी रक्कम उकळण्याचा प्रकार सुरू केला आहे, ज्यामुळे नोंदणीसाठी हुंडा दिल्याशिवाय नवविवाहित जोडप्यांना विवाह नोंदणी करता येत नाही.

विवाह हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण आणि मंगलमय सोहळा असतो. अनेक जोडपी मोठ्या खर्चाच्या ऐवजी साध्या पद्धतीने विवाह नोंदणी कार्यालयात नोंदणी करून नंतर मंदिरात धार्मिक विधी करून लग्न लावतात. या पद्धतीने खर्चही वाचतो आणि धार्मिक विधीही पार पडतात. विवाह नोंदणीसाठी रजिस्ट्रेशन ऑफ मॅरेज ॲक्टनुसार, आवश्यक कागदपत्रे आणि नाममात्र शासकीय फी असते, पण तरीही विवाह नोंदणी कार्यालयात काही कर्मचाऱ्यांनी खाजगी एजंटमार्फत हजारो रुपये उकळण्याची पद्धत सुरू केली आहे. शासनाने निश्चित केलेली नाममात्र शासकीय फी ३०० रुपये असतानाही, एजंट समोरच्या व्यक्तीच्या अंदाजानुसार पाच ते सात हजार रुपये खर्च येईल असे सांगितले जात आहे. यामुळे नवदाम्पत्यांची दिशाभूल केली जात आहे आणि त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक बोझा वाढवला जात आहे. विवाह नोंदणी कार्यालयात सातारा जिल्ह्यातील विविध भागातून लोक नोंदणीसाठी येतात, पण विवाह नोंदणी प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे त्यांचा गैरफायदा घेतला जात आहे. कार्यालयाच्या खाली असलेल्या एजंटांकडे पाठवून, अधिक पैसे उकळण्यात येत आहेत. या प्रकरणात सहाय्यक निबंधक कार्यालय असताना देखील, या खाबुगिरीच्या प्रकरणी का दुर्लक्ष केले जात आहे याचा प्रश्न नवदाम्पत्य आणि त्यांच्या कुटुंबीयांना पडला आहे. त्यामुळे या खाबुगिरीचा विरोध करून, संबंधित कर्मचार्यांवर कडक कारवाई होण्याची मागणी जोर धरत आहे.

# बाबुराव कोहळीकरांना हादगाव-हिमायतनगर मतदार संघातून जनतेचा पाठिंबा



**नांदेड । बालाजी पाटील**

हादगाव-हिमायतनगर मतदारसंघातील विकासासाठी कृतिशील योगदान देणारे आणि जनतेमध्ये लोकप्रिय असलेले नेते बाबुराव कोहळीकर यांना मतदारसंघातून व्यापक पाठिंबा मिळत आहे. या मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांत कोणत्याही पदावर नसतानाही कोहळीकर यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणला आहे, अशी माहिती त्यांच्या कट्टर समर्थक शंतनू आप्पा हनवते यांनी दिली.

हनवते म्हणाले की, एक नेता कसा असावा, याचे आदर्श उदाहरण बाबुराव कोहळीकर आहेत. आपल्या आयुष्यातील पन्नास वर्षे समाजसेवेत घालवून त्यांनी जनतेचे विश्वासार्ह नेतृत्व मिळवले आहे. कोणत्याही पदावर नसूनही त्यांनी हादगाव-हिमायतनगरमध्ये अनेक विकासकामे केली आहेत, असे ते म्हणाले. सध्या या मतदारसंघात चावडी-चावडीवर कोहळीकरांच्या विजयाची चर्चा रंगली आहे.

याआधी या मतदारसंघाचे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्यावर विकासकामात अकार्यक्षमता असल्याचा ठपका जनतेतून लावण्यात आला आहे. त्यामुळे नवीन नेतृत्वाची गरज असल्याचे जनतेतून व्यक्त होत असून, कोहळीकर यांना या निवडणुकीत मोठा पाठिंबा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**हिंगोलीचे माजी खासदार सुभाष वानखेडे यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश**

हिंगोली लोकसभेचे माजी खासदार सुभाष रावजी वानखेडे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची हुकूमशाही वृत्ती सहन न होताच शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी तीन पंचवार्षिक आमदार व एक पंचवार्षिक खासदार म्हणून काम केले आहे. वानखेडे यांनी पत्रकार परिषदेत शिवसेना नेत्या संजय राऊत यांच्यावर आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतलेल्या आरोपांचा उल्लेख करताना सांगितले की, बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमी सांगितले होते की, काँग्रेसशी शिवसेनेची युती झाली तर शिवसेना संपेल. आज शिवसेना त्या मार्गावर गेल्याचे त्यांनी वक्तव्य केले.

**काँग्रेसचे माजी नेते अनिल पाटील यांचा शिंदे गटात प्रवेश**

हादगाव-हिमायतनगर तालुक्यातील काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल पाटील यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिंदे गटात प्रवेश केला आहे. काँग्रेसचे निकटवर्तीय असूनही, विकासकामात अकार्यक्षमता असल्याच्या कारणावरून त्यांनी काँग्रेसचा त्याग केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवून शिंदे गटात प्रवेश केला आहे.

# हजारो नव उद्योजक घडवण्यात अनुराधा चव्हाण यांचा सिंहांचा वाटा :नरेंद्र पाटील

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठा समाजासाठी सुरु करण्यात आलेल्या सारथी संस्थेमुळे अनेक मराठा तरुण हे आज सरकारी नोकरीत मोठ्या हुद्द्यांवर आहेत. तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामुळे जिल्ह्यातील ११ हजार पेक्षा अधिक मराठा तरुण हे आज नोकरी मागणारे नाही तर नोकरी देणारे झाले आहे. मात्र मराठवाड्याच्या बहुतांशी भागात या योजनांचा लाभ घेण्यासाठी तरुणांना अडचणी येत होत्या. त्या सोडवण्यासाठी मराठा नव उद्योजकांना अनुराधा चव्हाण यांची मोलाची साथ मिळाली. चव्हाण आमदार झाल्यास हजारो नव उद्योजक उभे राहतील, असे प्रतिपादन अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. सोमवारी (दि. ११) रोजी कन्यादान लॉन्स सावंगी येथे आयोजित युवा संवाद मेळाव्यात बोलत होते.मतदार संघात नव मराठा तरुण उद्योजक घडवण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाचा लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोचविण्यासाठी कार्यालयात एखादा स्वतंत्र अधिकारी नेमणे असेल किंवा राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज वितरणात चालढकल होत असल्याबद्दल तरुणांची असलेली नाराजी दूर करून कर्ज मिळवून देणे. बँकांनी गरजू लाभार्थींची अडवणूक टाळण्यासाठी कामात सुलभता आणण्यासाठी त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचे काम केले. मतदार संघातील तरुण नोकऱ्या मागणारे नव्हे तर नोकऱ्या देणारे झाले पाहिजेत असे ध्येय मनाशी मी बाळगले असून आता मला फक्त तुमची साथ हवी आहे, असे आवाहन अनुराधा चव्हाण यांनी केले.

# मशाल ही क्रांतीची नव्हे,तर घरे जाळण्यासाठी घेतली आहे-मुख्यमंत्री शिंदे यांचे वक्तव्य

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

दि. ११ नोव्हेंबर रोजी वैजापूर येथील आमदार रमेश बोरणारे यांच्या प्रचारसभेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शक्तीशाली भाषण केले. त्यांनी विरोधकांना घेरताना, मशाल हे चिन्ह क्रांतीसाठी नव्हे, तर लोकांची घरे जाळण्यासाठी वापरले जात असल्याचे वक्तव्य केले.

मुख्यमंत्री शिंदे यांचे म्हणणे होते की, विरोधक हे केवळ बोरणारे सर यांचे काम पाहून बोलतात. त्यांना फक्त खालच्या पातळीवर बोलता येते, गद्दाराची भाषा वापरली जाते, पण गद्दार कोण हे त्यांना समजत नाही. ते पुढे म्हणाले की, आमदार बोरणारे यांनी जातीपातीचे राजकारण न करता सर्वसमावेशक विकास केला आहे. त्यांच्या कामांची तारीफ करतांना विरोधकांना हे दिसत नाही.

माजी आमदार भाऊसाहेब तात्याची चिकटगावकर यांनी आदित्य ठाकरे यांच्या शिऊर येथील सभेबद्दल सांगितले की, आदित्य ठाकरे यांना त्यांच्या आराध्य दैवत श्री शंकर स्वामी आणि बहिणाबाई यांच्या मंदिरात जाऊन दर्शन घ्यायला वेळ मिळाला नाही, पण ते म्हणतात की बोरणारे सर जातीपातीचे राजकारण करत आहेत.

मुख्यमंत्री शिंदे यांनी वैजापूरमधील ३००० कोटी रुपयांच्या विकासकामांचा उल्लेख केला आणि आगामी योजनांची माहिती दिली. त्यांनी रामकृष्ण गोदावरी जलसिंचन योजना व दहेगाव प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आम्ही जो जाहीरनामा तयार केला, तो विरोधकांनी आमच्यापासून चोरून घेतला आहे. आम्ही लाडकी बहीण योजना आणली, आता ते महालक्ष्मी योजना सांगत आहेत. त्यांच्या वचनांवर विश्वास ठेवा, ते महाराष्ट्राचा विकास कसा करणार?मुख्यमंत्री शिंदे यांनी परत एकदा विरोधकांवर हल्ला करत, मशाल या चिन्हाचा वापर क्रांतीसाठी नव्हे, तर घरे जाळण्यासाठी करण्यात आल्याचे प्रतिपादन केले. विरोधकांना त्यांच्या कामाचे उत्तर देत मुख्यमंत्री शिंदे यांनी आगामी निवडणुकीसाठी जनतेला विश्वास देताना, आम्ही केलेल्या कामांची जाणीव तुम्हाला २३ तारखेला होईल आणि तुम्हाला सक्षम उमेदवार कोण हे कळेल, असे सांगितले.



# आदर्श गावचे सरपंच भास्कर पेरे यांचा डॉ. सोनवणे यांना पाठिंबा

**गंगापूर । प्रतिनिधी**

-खुलताबाद मतदारसंघातील पाटोदा गावचे माजी सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी डॉ. सुरेश सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. भास्कर पेरे पाटील यांनी सांगितले की, सतरा वर्षांत विधान परिषदेत एक आमदार आणि १५ वर्षांपासून विद्यमान आमदारांकडून जो विकास झाला नाही, तो विकास मी येत्या पाच वर्षांत करून दाखवणार आहे.

त्यांनी पुढे असेही म्हटले की, आमदार प्रशांत बंब यांना गावात फिरणे कठीण झाले आहे, तसेच सतीश चव्हाण यांचे संस्थेतील भर देखील न करता आले. शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात बोलताना, पेरे पाटील यांनी आपले विचार मांडले, पुढील पाच वर्षांमध्ये प्रत्येक शाळा डिजिटल केली जाईल आणि स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करून शाळा अधिक आधुनिक बनवण्यात येतील.

वेरुळ शहराच्या संदर्भात त्यांनी सांगितले की,





वेरुळ जागतिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते, मात्र तेथे सुविधांच्या अभावामुळे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे.

भास्कर पेरे पाटील यांनी डॉ. सोनवणे यांच्यावर विश्वास व्यक्त केला आणि म्हणाले, सोनवणे सरांनी मला शब्द दिला आहे की, ते गंगापूर तालुक्याचा शाश्वत विकास करून प्रत्येक गाव पाटोदा सारखे आदर्श गाव बनवतील. त्याच कारणामुळे, पाटोदा गावच्या विकासातील त्यांच्या योगदानामुळे आणि सोनवणे यांच्यावरील विश्वासाने त्यांनी डॉ. सुरेश सोनवणे यांना आपला पूर्ण पाठिंबा दिला आहे.

## नागपूरमध्ये आयफोन १६ चोरी प्रकरणी दिल्लीतून आरोपीला अटक

**नागपूर । प्रतिनिधी**

सिव्हिल लाइन्स येथील मोबाईल शॉपीतून आयफोन १६ प्रो मॅक्स चोरी करणाऱ्या आरोपीला नागपूर पोलिसांनी दिल्लीतून अटक केली आहे. आरोपी हुसैन मकसुद अली (वय ३५, रा. गौतम विहार, नॉर्थ ईस्ट दिल्ली) असे त्याचे नाव आहे.

२८ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठ वाजता इस्पायर पल स्टोअरमध्ये चार्जिंगला ठेवलेला आयफोन चोरीला गेला. स्टोअरचे मालक रोहीत दिलीप गुप्ते यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज पाहून आरोपीचा चेहरा ओळखला आणि त्याच्या मागावर लागले.




तपासात आरोपी दिल्लीत लपून बसल्याचे समोर आले, त्यानुसार पोलिसांनी दिल्लीत जाऊन आरोपीला अटक केली.

आता आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार असून, पोलिसांनी या चोरीची सखोल चौकशी सुरू केली आहे.

## शेअर मार्केट व फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणूक फसवणुकीचा आकडा सुमारे दीड कोटीवर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर : शेअर मार्केट व फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सुमारे १ कोटी ४३ लाखांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी जून महिन्यात ११ लाख २० हजाराच्या फसवणुकीचा गुन्हा कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. मात्र, तपासात फसवणुकीचा आकडा सुमारे दीड कोटीवर पोहचला आहे. दरम्यान, या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. याप्रकरणी संदीप बाबुराव कोठुळे (वय ४३, रा. साखर कारखाना कामगार वसाहत, श्री शिवाजीनगर, ता.



राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे


एच. आर. श्रीकांत आचार्य (रा. पाटील हाऊस, शुक्रवार पेठ, पुणे)धर्मेन्द्र सिंग सेगर (रा. बुधती होरांगाबाद, भोपाळ, मध्यप्रदेश)दिनेश योगेश भटनाकर (अशोका हेरिटेज, विशालनगर, पिंपळे निलख, पुणे)साजीद शेख (रा. कोंढवा बुद्रुक, पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आचार्य, भटनाकर व शेख यांना अटक करण्यात आली आहे.

## ३१ गावठी कट्टे,७ कोयते आणि ५ तलवारी सह ४३ हत्यारे जप्त

**उल्हासनगर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक शांततेत आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या नेतृत्वाखाली आणि सहआयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ९ नोव्हेंबरच्या रात्री ११ वाजल्यापासून ते १० नोव्हेंबरच्या पहाटे २ वाजेपर्यंत ठाणे जिल्ह्यातील ५ पोलीस परिमंडळात पोलिसांनी 'ऑल आऊट ऑपरेशन' राबवले आहे.

या ऑपरेशनमध्ये ३१ गावठी कट्टे, ७ कोयते आणि ५ तलवारी सह ४३ हत्यारे जप्त करण्यात आली असून, ४१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच विविध गुन्ह्यात,प्रकरणात मोठ्या प्रमाणात आरोपी जेरबंद करण्यात आले आहेत. याशिवाय तडीपारीचे उल्लंघन करणाऱ्या रेकोर्ड वरील गुन्हेगारांच्या देखील मुसक्या



आवळण्यात आल्या आहेत.

या मोहिमेत पोलीस परिमंडळ १ ते ५, स्थानिक गुन्हे शाखा,वाहतूक शाखेतील कर्मचारी असे एकूण ३१२ पोलीस अधिकारी आणि १२८८ पोलीस कर्मचाऱ्यांनी भाग घेतला आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.

अवैध मद्यविक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी ५७ गुन्हे दाखल करून तब्बल ५ लाखाच्या वर किमतीची अवैध दारू जप्त केली आहे. यात १८५ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर प्रतिबंध लावण्यासाठी ठाणे पोलिसांनी 'कोटपा कायद्यानुसार' १७९ जणांवर कारवाई केली आहे. ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान ७४ हॉटेल्स, ६४ लॉज, ३९ बियर बार, ४२ डान्स बार आणि इतर आस्थापनांची तपासणी करण्यात आली.

तसेच रेकॉर्डवरील ५९ हिस्ट्रीशिटर, ५० तडीपार आणि ३१ गुंड यांची तपासणी करून ४७ तडीपार गुंडांना अटक करण्यात आली. अंमलीपदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत १५ जणांना अंमलीपदार्थ सेवनाच्या आरोपावरून ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे नोंदवले आहेत. वाहतूक शाखेने एकूण १२१० लहान-मोठी वाहने तपासून मोटर वाहन कायद्यानुसार २१४९ वाहनांवर कारवाई केली आणि तब्बल १८ लाख ५८ हजार ७५० रुपये दंड वसूल केला आहे.

## करमाळा येथील प्रसिद्ध व्यापारी रितेश कटारिया यांचा आमदार संजय शिंदे यांना जाहीर पाठिंबा



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहरातील सुप्रसिद्ध किराणा व्यापारी रितेश कटारिया यांनी आज आमदार संजय शिंदे यांना जाहीर पाठिंबा दिला. करमाळा शहरात आयोजित रॅलीत त्यांनी आपला पाठिंबा जाहीर केला असून, या पाठींब्यामुळे शहरातील व्यापारी वर्गात तर्क-वितर्क सुरू आहेत.रितेश कटारिया हे शिवसेनेचे उमेदवार दिग्विजय बागल यांचे निकटवर्तीय मानले जातात, त्यामुळे त्यांच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या कार्यक्रमाला अर्बन बँकेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, माजी नगराध्यक्ष प्रविणकुमार जाधव, आशपाक जमादार यांसह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# ईव्हीएम वर 'मॉकपोल' करून जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत:केली खात्री

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चंद्रपूर तहसील कार्यालयामध्ये मतदान यंत्र सज्ज करण्याच्या प्रक्रियेची जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी यांनी पाहणी करून एका मशीनवर स्वत: 'मॉकपोल' करून बघितले. यावेळी चंद्रपुरचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय पवार उपस्थित होते.

मतदानासाठी आता केवळ नऊ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे निवडणुकीच्या कामाबाबत प्रशासनाची लगबग वाढली आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणा-या मतदानासाठी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र तयार करण्याची प्रक्रिया चंद्रपूर तहसील कार्यालयात दोन दिवस पार पडली. आज (दि. ११) जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी तहसील कार्यालयाला भेट देत मतदान यंत्र सज्ज करण्याची प्रक्रिया पाहिली. तसेच उमेदवारांच्या नावासंदर्भात तपासणी करून घेतली. यावेळी त्यांनी एका मशीनवर 'मॉकपोल' करून





व्हीव्हीपॅटद्वारे दिसणा-या चिठ्ठीचीसुध्दा स्वत: खात्री केली.

मतदानानंतर लगेच तीन दिवसांनी म्हणजे २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी असल्याने जिल्हाधिका-यांनी मतमोजणी कक्षाच्या पुर्वतयारीची पाहणी केली. यावेळी त्यांनी मतमोजणी कक्ष ले-आऊट बद्दल तसेच सीसीटीव्हीमध्ये संपूर्ण परिसर कव्हर व्हायला पाहिजे, अशा सुचना संबंधितांना दिल्या.

चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात एकूण ९३६ बॅलेट युनीट, ४६८ कंट्रोल युनीट आणि ५०३ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत. मशीन तयार करण्याच्या प्रक्रियेसाठी तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे एकूण ३० टेबल लावण्यात आले. प्रत्येक टेबलवर ३ कर्मचारी याप्रमाणे एकूण ९० कर्मचा-यांमार्फत ईव्हीएम, व्हीव्हीपॅटसह मशीन सज्ज करण्यात आल्या. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील ३९० मतदान केंद्रासाठी असलेल्या ईव्हीएमपैकी ५ टक्के म्हणजे २३ मशीन मॉक पोलकरीता रॅन्डम पध्दतीने निवडण्यात आल्या. प्रत्येक मशीनवर १००० याप्रमाणे दोन दिवसांत २३ मशीनवर २३ हजार मॉक पोल घेण्यात आले.

# साहेबराव कांबळे यांच्या प्रचारासाठी नाना पटोले यांची उमरखेड येथे जाहीर सभा; जनतेचा अथांग जनसागर



**गणेश राठोड । तालुका प्रतिनिधी, उमरखेड**

उमरखेड येथे आज महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश कमिटी अध्यक्ष नाना पटोले यांच्या जाहीर सभेला जनतेचा अथांग जनसागर जमला. शासकीय विश्रामगृह परिसरात आयोजित या सभेत साहेबराव कांबळे यांनी आपल्या मतदारसंघातील समस्यांचा पाढा वाचत, मतदारसंघाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

**मतदारसंघातील समस्या आणि विकासाचे संकल्प***

साहेबराव कांबळे यांनी आपल्या भाषणात मतदारसंघात तरुणांना रोजगार नसल्याचे सांगून महायुती सरकारच्या निष्क्रीयतेवर टीका केली. गेल्या १० वर्षांत महायुती सरकारने तालुक्यात उद्योग आणण्यासाठी काहीही केले नाही. बेरोजगारीने तरुणांवर गंभीर परिणाम होत आहे, असे ते म्हणाले. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अपमान सहन न करता, तो पुन्हा दिमाखात उभारण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

**महिलांच्या आणि आरोग्याच्या समस्यांवर भर***

कांबळे यांनी आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी आणि महिलांच्या विकासासाठी काम करण्याची तयारी दर्शवली. सर्व आरोग्य यंत्रणा सलाईनवर आहेत; त्या सुधारण्याची आवश्यकता आहे, असे ते म्हणाले.

**नाना पटोले यांची मोदी सरकारवर टीका**

महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी महायुती सरकारवर भ्रष्टाचाराच्या आरोपांसह जोरदार टीका केली. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु आजही शेतकरी आत्महत्या करत आहेत. आम्ही विदर्भातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा संपूर्ण लाभ देण्यास कटिबद्ध आहोत, असे त्यांनी सांगितले. भाजपवर टीका करताना ते म्हणाले की, भाजपला शेतकऱ्यांच्या घामाची किंमत देण्याची तयारी नाही, फक्त हिंदू-मुस्लिम मुद्द्यावर ते राजकारण करतात.

***शिक्षण आणि शेतकरी प्रश्नांवर भाष्य**

पटोले यांनी भाजप सरकारवर जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करून गरीब मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा आरोप केला.

**अवैध धंदे आणि रस्ते समस्यांवर टीका**

या मतदारसंघात अवैध धंद्यावर नियंत्रण नाही. अधिकाऱ्यांचे स्थिरतेचा अभाव असून, महायुती सरकार गेल्याशिवाय सुधारणा शक्य नाही. रस्त्यांवर कमिशनखोरीमुळे हाल झालेला आहे, असा आरोप काँग्रेसने केला.

**महाविकास आघाडीचे पाठबळ**

साहेबराव कांबळे यांच्या पाठीशी नाना पटोले आणि खासदार नागेश पाटील आष्टीकर ठाम उभे आहेत. आष्टीकर यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना आग्रह केला की, काम मनधन लावून करा, जे काम करणार नाही त्यांना गय केली जाणार नाही.

## आ.सतीश चव्हाण यांना धक्का,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर निळ हजारो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत



**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा धक्का देत तालुकाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर निळ यांनी उपजिल्हाध्यक्ष अनिल बबलू पाटील पोळ, तालुका युवक अध्यक्ष बापूसाहेब सातपुते आणि अन्य शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत वैजापूर येथे आयोजित जाहीर सभेत हा प्रवेश सोहळा पार पडला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेक वर्षांपासून घुसमट होत असल्याची भावना व्यक्त करत, डॉ. निळ म्हणाले की, २०१४ पासून पक्ष नेतृत्वाकडून अन्याय सहन करत होतो. २०२४ मध्येही अपेक्षित न्याय मिळाला नाही, ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला. कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासकामांवर प्रेरित होऊन शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

मुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकरी, महिला, कामगार यांना न्याय दिल्याचे सांगत डॉ. निळ यांनी त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना प्रवेश केला असल्याचे स्पष्ट केले. याप्रसंगी खासदार संदिपान भुमरे, आमदार रमेश बोरणारे, माजी सभापती दिलीप सिंग राजपूत, तालुका प्रमुख दिलीप निरपळ, तालुका समन्वयक सारंगधर जाधव, उपतालुकाप्रमुख संदीप मनोरे, उपसभापती सचिन काकडे आणि युवा सेना उपजिल्हाप्रमुख संतोष आरगडे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला

## गणेश चिवटे यांचा आ.संजयमामा शिंदे यांना पाठिंबा; करमाळ्यात शक्तिप्रदर्शन



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा मतदारसंघातील विकास कामे मार्गी लावण्याचे वचन देत, आमदार संजयमामा शिंदे यांच्या पाठिंब्यासाठी गणेश चिवटे यांनी आपले समर्थन जाहीर केले. गायकवाड चौक येथून सुरु झालेल्या पदयात्रेमध्ये समर्थकांसह विविध मान्यवरांनी सहभाग घेतला.

यावेळी आमदार शिंदे म्हणाले की, करमाळा तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडवण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही कार्यरत आहोत. आगामी दोन वर्षांत विकासाचे संकल्प पूर्ण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. त्यांनी मतदारसंघातील स्थिर सरकारच्या गरजेवरही भर दिला.

जिल्हा नियोजन समिती सदस्य गणेश चिवटे यांनी आमदार शिंदे यांना पाठिंबा देत म्हणाले, करमाळा तालुक्यातील शिक्षण, आरोग्य, रोजगार, वीज, उद्योग आदी क्षेत्रात अजूनही प्रगती व्हावी लागेल. त्यांनी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिंदे यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देण्याचे कारण स्पष्ट केले.

या कार्य्र मात चंद्रकांत सरडे, विलास पाटील, लतीफभाई तांबोळी यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल पवार यांनी केले तर आभार उमेश मगर यांनी मानले. मंचावर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उद्धव माळी, नागरिक संघटनेचे कन्हैयालाल देवी, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## शिंदेंची सभा रद्द होताच ब्लड प्रेशर वाढलेला उमेदवार व्हीलचेअरवर

### मतदारसंघात, राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा



**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर : श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या तिकिटावर लढणाऱ्या शिवसेना (शिंदे गट) उमेदवार भाऊसाहेब कांबळे यांची सभा रद्द झाल्याने त्यांच्या रक्तदाबात वाढ झाली आणि त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. उपचारानंतर त्यांनी थेट व्हीलचेअरवरून मतदारसंघात प्रचार सुरू केला, ज्यामुळे त्यांच्या प्रचाराची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

श्रीरामपूर मतदारसंघात महायुतीने अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमधून लहू कानडे यांना उमेदवारी दिली आहे. त्याचवेळी, शिंदे गटाने भाऊसाहेब कांबळे यांना उमेदवार म्हणून मैदानात उतरवले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची कांबळे यांच्या प्रचारासाठी सभा नियोजित होती, पण ती अचानक रद्द झाली. या निर्णयामुळे कांबळे यांचा रक्तदाब वाढल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारानंतर व्हीलचेअरवर बसून कांबळे यांनी मतदारसंघात प्रचार सुरू केला, ज्यामुळे त्यांच्या या अनोख्या प्रचाराची आता चर्चा सुरू झाली आहे.

श्रीरामपूर मतदारसंघात महायुतीतील उमेदवारांमध्ये मैत्रीपूर्ण स्पर्धा होत असल्याचे दिसत आहे. लहू कानडे यांच्यासाठी दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे यांनी सभा घेतली होती, तर मुख्यमंत्री शिंदे यांची कांबळे यांच्या प्रचारासाठी सभा नियोजित होती, पण ती रद्द झाली. यामुळे मतदारसंघातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

या मतदारसंघात महाविकास आघाडीकडून हेमंत ओगले, महायुतीकडून लहू कानडे आणि भाऊसाहेब कांबळे अशी तिरंगी लढत रंगणार आहे. महाविकास आघाडीविरोधात महायुतीचे दोन उमेदवार असल्याने मतविभाजन होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे नेमका कोण बाजी मारेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, भाऊसाहेब कांबळे यांनी नाव न घेता राधाकृष्ण विखे पाटलांवर टीका केली आहे. जिल्ह्यातील काही नेत्यांचा माझ्यावर दबाव आहे. मला उमेदवारी देणारे हेच लोक आहेत आणि माघार घ्यायला लावणारेही हेच आहेत, असे कांबळे म्हणाले. पक्षाने दिलेला एबी फॉर्म त्यांच्याकडे असल्याने ते धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## करमाळ्यात ‘धनुष्यबाण’मुळे बागल गटाला उभारी;मुख्यमंत्री शिंदेंची सभा ठरली टर्निंग पॉइंट



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीला चुरशीचे वळण लागले असून महायुतीचे उमेदवार (शिवसेना शिंदे गट) दिग्विजय बागल यांची स्थिती सशक्त होत चालली आहे. राजकीय सत्तेपासून दूर असलेल्या बागल गटात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठिंब्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

करमाळ्याची जागा कोणाला मिळणार हा प्रश्न आधीच चर्चेत होता. आमदार संजय शिंदे हे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे समर्थक असल्याने हा मतदारसंघ त्यांच्या बाजूला झुकत होता. मात्र आमदार शिंदे यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतल्यानंतर शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी हा मतदारसंघ ‘धनुष्यबाण’कडे ठेवण्यात यश मिळवले. स्वतः इच्छुक असूनही चिवटे यांनी दिग्विजय बागल यांना उमेदवारी देण्यासाठी मागे हटत भूमिका घेतली आणि हा निर्णय करमाळ्यातील राजकारणात गेमचेंजर ठरला आहे.

जागा वाटपाबाबत निर्माण झालेला तिढा सोडवण्यासाठी भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर, स्व. माजी मंत्री दिगंबरराव बागल यांचे पुत्र आणि भाजप महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांचे बंधू दिग्विजय बागल यांना शिवसेनेची उमेदवारी देण्यात आली.

मुख्यमंत्री शिंदे यांची करमाळ्यात सभा झाल्यानंतर बागल गटात उत्साहाची लाट उसळली आहे. बागल गटाचा जनाधार, शिवसेनेची ताकद, आणि जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केलेली कार्ये यामुळे दिग्विजय बागल यांची उमेदवारी प्रभावी ठरू लागली आहे. सुरुवातीला ही लढत संजय शिंदे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांच्यात होईल, अशी चर्चा होती. मात्र, मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठिंब्यामुळे बागल गट आता प्रमुख स्पर्धक ठरत आहे.

शिवसेनेचे प्रचार प्रमुख म्हणून महेश चिवटे काम पाहत असून, त्यांनी बागल यांच्या विजयासाठी आपला संपूर्ण प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे.

## आश्लेषा बागडेने कुस्ती स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळ्यातील विद्या विकास मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील खेळाडू कु. आश्लेषा बागडे हिने ५७ किलो वजन गटात सुवर्णपदकाची कमाई केली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या वतीने इंदापूर येथे ८ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेत आश्लेषा बागडे हिने कोल्हापूरच्या पूजा पाटीलवर अंतिम सामन्यात चितपट विजय मिळवून गोल्ड मेडल पटकावले.

या यशात प्रा. राम काळे यांच्या मार्गदर्शनाचे महत्त्वाचे योगदान लाभले. यशाबद्दल संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.



## तारीख लक्षात ठेवा, २० नोव्हेंबरला विधानसभेसाठी मतदान अवश्य करा: जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले



**वर्धा । प्रतिनिधी**

२० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले यांनी आवाहन केले आहे. तारीख लक्षात ठेवा, २० नोव्हेंबर, मतदान अवश्य करा! असे सांगत कर्डीले यांनी सर्व मतदारांना लोकशाहीच्या उत्सवात सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन केले.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भारत निवडणूक आयोग आणि माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा जिल्हा प्रशासनाने एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. केंद्रीय संचार ब्यूरो, वर्धा, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या सहकार्याने जिल्ह्यातील मतदार जनजागृतीसाठी मल्टिमिडीया व्हॅनचा शुभारंभ करण्यात आला. या व्हॅनमधून मतदारांना मतदानाचे महत्त्व आणि प्रक्रियेबाबत माहिती देणारे व्हिडीओ संदेश दाखवले जातील.

व्हॅनला जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते सुरू करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुराग जैन, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनिल गावीत, एमसीएमसीचे नोडल अधिकारी रवी गिते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले, भारतीय लोकशाही ही जगातील सर्वोत्तम लोकशाही आहे, आणि या व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अमूल्य हक्क दिला गेला आहे. प्रत्येक सुजाण मतदाराने आपल्या मतदानाचा हक्क बजवणं आवश्यक आहे, त्यामुळे लोकशाही अधिक बळकट होईल. त्यांनी सर्व नागरिकांना २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क न चुकता बजावण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या इतर प्रमुख उपस्थितांमध्ये पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांनी निर्भय व शांततापूर्ण वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज असल्याचे सांगितले आणि नागरिकांना आमिषांना बळी न पडता आपल्या मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी नवचैतन्य बहुविकास युवा मंडळ, शिरोळी, यवतमाळ यांच्या पथकाने कलापथक सादर केले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन स्वीपचे सहायक नोडल अधिकारी संजय नवले यांनी केले.

२० नोव्हेंबरला प्रशासनाच्यावतीने सुटी जाहीर केली असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाहीच्या उत्सवात आपला सहभाग नोंदवावा, असे प्रशासनाचे आवाहन आहे.

# काँग्रेसला धक्का; रामटेकमध्ये बंडखोर राजेंद्र मुळक यांना सुनील केदार व श्याम बर्वे यांचे समर्थन

**नागपूर । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात अंतर्गत बंडाळी उफाळून आली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते राजेंद्र मुळक यांनी पक्षाचा आदेश न पाळता महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराविरोधात अपक्ष उमेदवारी जाहीर केली आहे. या बंडखोरीनंतर काँग्रेसने त्यांची हकालपट्टी केली असली तरी मुळक यांच्या प्रचारासाठी काँग्रेसचेच काही नेते मैदानात उतरताना दिसत आहेत, त्यामुळे महाविकास आघाडीत खळबळ माजली आहे.

रामटेक विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार ठाकरे यांच्याविरोधात मुळक यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. सोमवारी चाचेर गावात झालेल्या प्रचारसभेत काँग्रेसचे नेते सुनील केदार, रामटेकचे खासदार श्याम बर्वे, तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्षा रश्मी बर्वे यांनी मुळक यांच्या बाजूने प्रचार करत मते मागितली. त्यामुळे





आघाडीतील पक्षांतर्गत संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरोधात प्रचार करून बंडखोर उमेदवाराला पाठिंबा देणे पक्षाच्या नीतीविरुद्ध मानले जात आहे. यामुळे काँग्रेसच्या अंतर्गत गटबाजीचे चित्र समोर आले आहे. आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे की, काँग्रेस पक्ष या नेत्यांविरुद्ध कोणती कारवाई करणार आणि मुळक यांना समर्थन देणाऱ्या नेत्यांचे भवितव्य काय असेल. महाविकास आघाडीत या घटनांमुळे आगामी निवडणुकीच्या तोंडावर गोंधळ निर्माण झाला असून, काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते यामुळे संभ्रमात आहेत.

# अशोक शिंदे स्वगृही परतले;उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन

**वर्धा । प्रतिनिधी**

तीन वेळा आमदार आणि एक वेळा मंत्री राहिलेले अशोक शिंदे यांनी आज शिवसेनेत पुनरागमन केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते त्यांना शिवबंधन बांधण्यात आले. स्वगृही परत आल्याचा आनंद व्यक्त करत शिंदे यांनी त्यांच्या राजकीय प्रवासाची माहिती दिली.

शिंदे म्हणाले, मी शिवसैनिक आहे आणि ठाकरे परिवाराचा अनुयायी आहे. हिंगणघाट व वर्धा जिल्ह्यात शिवसेनेची बांधणी केली. लोकांच्या प्रेमामुळे तीन वेळा निवडून आलो आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने मला नारायण राणे यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले.

त्यांनी स्पष्ट केले की, काही शिवसेनेतील मंडळींमुळे गैरसमज झाले आणि दूरावा निर्माण झाला. काँग्रेसमध्ये प्रवेश केला, पण तिथेही समाधान मिळाले नाही. नंतर शिंदे यांच्या



सेनेतही सामील झालो, परंतु त्यातही अपेक्षित बदल झाले. अखेर माझे मन सांगते की 'गड्या आपलं गाव बरं'.

शिवसेनेत परतण्याचा निर्णय घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी कोणतीही अट न ठेवता मला स्वीकारले, असे शिंदे यांनी सांगितले. महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचार करून त्यांना निवडून आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

शिंदे यांच्या या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्यातील राजकीय समीकरणात बदल होण्याची शक्यता असून, ते आता जिल्ह्यात दौरे सुरू करून शिवसेनेची ताकद पुन्हा एकत्र करण्याचा प्रयत्न करणार आहेत

# अशोक शिंदे स्वगृही परतले;उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन

**वर्धा । प्रतिनिधी**

तीन वेळा आमदार आणि एक वेळा मंत्री राहिलेले अशोक शिंदे यांनी आज शिवसेनेत पुनरागमन केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते त्यांना शिवबंधन बांधण्यात आले. स्वगृही परत आल्याचा आनंद व्यक्त करत शिंदे यांनी त्यांच्या राजकीय प्रवासाची माहिती दिली.

शिंदे म्हणाले, मी शिवसैनिक आहे आणि ठाकरे परिवाराचा अनुयायी आहे. हिंगणघाट व वर्धा जिल्ह्यात शिवसेनेची बांधणी केली. लोकांच्या प्रेमामुळे तीन वेळा निवडून आलो आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने मला नारायण राणे यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले.

त्यांनी स्पष्ट केले की, काही शिवसेनेतील मंडळींमुळे गैरसमज झाले आणि दूरावा निर्माण झाला. काँग्रेसमध्ये प्रवेश केला, पण तिथेही समाधान मिळाले नाही. नंतर शिंदे यांच्या सेनेतही सामील झालो, परंतु त्यातही अपेक्षित



बदल झाले. अखेर माझे मन सांगते की 'गड्या आपलं गाव बरं'.

शिवसेनेत परतण्याचा निर्णय घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी कोणतीही अट न ठेवता मला स्वीकारले, असे शिंदे यांनी सांगितले. महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचार करून त्यांना निवडून आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

शिंदे यांच्या या निर्णयामुळे वर्धा जिल्ह्यातील राजकीय समीकरणात बदल होण्याची शक्यता असून, ते आता जिल्ह्यात दौरे सुरू करून शिवसेनेची ताकद पुन्हा एकत्र करण्याचा प्रयत्न करणार आहेत.

# निवडणूक कर्तव्य अत्यंत काळजीपूर्वक व उत्तमरित्या पार पाडावे : विनय बुबलाणी

## वर्धा विधानसभा निवडणुकीसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची सभा आणि प्रशिक्षण

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा विधानसभा मतदारसंघातील २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी १० नोव्हेंबर २०२४ रोजी एक सभा आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन निवडणूक निरीक्षक विनय बुबलानी यांच्या अध्यक्षतेखाली झाले, ज्यामध्ये सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मतदान प्रक्रिया काळजीपूर्वक पार पाडण्याचे निर्देश देण्यात आले.

निवडणूक निर्णय अधिकारी दीपक कारंडे, संदिप पुंडेकर, आणि श्रीमती कौशल्याराणी पाटील यांच्यासह सर्व तहसिलदार व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत वर्धा आणि सेलू क्षेत्रातील एकूण ३४६ मतदान केंद्रांवर नियुक्त केलेल्या ३५ क्षेत्रीय



अधिकाऱ्यांची जबाबदारी स्पष्ट करण्यात आली.

निवडणूक निरीक्षक विनय बुबलानी यांनी मतदान प्रक्रियेतील आवश्यक बाबींचे सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी मतदान केंद्रांवरील सुविधांची तपासणी करण्याची सूचना दिली, तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी साहित्य वितरण, मतदान पथकांना सुरक्षित केंद्रांवर रवाना करणे आणि ईव्हीएम मशीनची देखरेख यावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले.

सभेत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मतदानाच्या दिवशी आवश्यक असलेल्या अहवालांची माहिती देण्यात आली आणि त्यांच्या कर्तव्यांची स्पष्टता करण्यात आली. प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मतदान प्रक्रियेसाठी वाहने उपलब्ध करून देण्यात आली असून, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी वेळोवेळी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

निवडणूक निरीक्षक विनय बुबलानी यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यांबाबत मार्गदर्शन केले आणि मतदानाच्या दिवशी प्रत्येकाने अत्यंत काळजीपूर्वक आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे वर्धा विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया अधिक सक्षम आणि सुव्यवस्थितपणे पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे, असे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक कारंडे यांनी सांगितले.

# कापूस शेतात झोपलेल्या शेतकऱ्याचा धारदार शस्त्राने खून

**वारंगा मसाई । कळमनुरी । जि.हिंगोली**

कळमनुरी तालुक्यातील वारंगा मसाई येथील ६२ वर्षीय शेतकरी साहेबराव नागोजी गिराम यांचा धारदार शस्त्राने हल्ला करून खून झाल्याची घटना १२ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. कापूस वेचून रात्री शेतात झोपलेले असताना त्यांच्यावर हा हल्ला झाला. या घटनेने गावात खळबळ उडाली आहे, तर खुनाचे कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.११ नोव्हेंबरच्या रात्री कापसाचे काम करून साहेबराव गिराम शेतात झोपले होते. सकाळी त्यांचा मुलगा शेतात गेल्यावर त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. त्याने आरडाओरड केली, ज्यामुळे कुटुंबीय आणि गावकरी घटनास्थळी पोहोचले.पोलिसांनी माहिती मिळताच घटनास्थळी तातडीने पोहोचून तपास सुरू केला. पोलिस उपअधीक्षक भुसारे, पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक पोलिस निरीक्षक हनुमंत भिंगारे, तसेच गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी आले. श्वानपथक आणि तांत्रिक साधनांचा वापर करून तपास सुरू आहे. मृतदेह विच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.साहेबराव गिराम यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. या खूनाच्या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिस अधिक तपास करत आहेत.



# करमाळ्याच्या विकासासाठी प्रा.रामदास झोळ यांना निवडून द्या–दशरथ अण्णा कांबळे यांचे आवाहन

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील जातीय व गटीय राजकारणाला फाटा देऊन तालुक्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रा. रामदास झोळ यांना निवडून द्यावे, असे मत शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ अण्णा कांबळे यांनी व्यक्त केले. जिंती येथे प्रा. रामदास झोळ यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

यावेळी प्रा. झोळ यांच्या वडील मधुकर झोळ, अनुरथ झोळ, पांडुरंग झोळ, मायाताई झोळ, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ मंगवडे, काँग्रेस ओबीसी तालुका अध्यक्ष गफूर शेख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र गोडगे, आणि तुकाराम खाटमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सभेत दशरथ अण्णा कांबळे म्हणाले की,







तालुक्याच्या विकासासाठी प्रस्थापित नेते गेली अनेक वर्षे सत्ता सांभाळत आहेत, मात्र रस्ते, पाणी, वीज यांसारखे प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरले आहेत. प्रा. झोळ यांचे कार्य मात्र शेतकरी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर केंद्रित आहे, आणि त्यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय विकास साधता येईल.

प्रा. रामदास झोळ यांनी देखील मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मी रस्ते, पाणी, वीज, शिक्षण आणि रोजगार निर्मितीसाठी पायाभूत काम करणार असून, तालुक्याचा विकास साधण्यासाठी कटीबद्ध आहे. या माध्यमातून शेतकरी व श्रमिकांना न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न करणार आहे.

सभेच्या प्रास्ताविकात श्रीकांत साखरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर आभार प्रदर्शन रवींद्र गोडगे यांनी केले. कार्यक्रमास शेतकरी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्धा जिल्ह्यात मुद्रित माध्यमांच्या राजकीय जाहिरातीचे पूर्व प्रमाणीकरण आवश्यक

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून, मतदानापूर्वीचा एक दिवस १९ नोव्हेंबर आणि मतदानाच्या दिवशी २० नोव्हेंबर रोजी मुद्रित माध्यमांद्वारे (प्रिंट मिडिया) प्रकाशित होणाऱ्या राजकीय जाहिरातींना भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पूर्व प्रमाणीकरण घेणं आवश्यक आहे.

वर्धा जिल्ह्यातील सर्व चार मतदारसंघांसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली 'माध्यम पूर्व प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती' (एम.सी.एम.सी.) स्थापन करण्यात आली आहे. या समितीला दोन दिवस आधी राजकीय जाहिरातींशी संबंधित अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर झाल्यावर एम.सी.एम.सी. समितीने ४८ तासांच्या आत प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे. यामुळे मतदान प्रक्रियेला अडथळा येणार नाही, तसेच कोणतीही दिशाभूल करणारी किंवा द्वेषपूर्ण जाहिराती प्रचारामध्ये दिसून येणार नाहीत, याची दक्षता घेतली जाईल.

भारत निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी मुद्रित माध्यमांतून कोणतीही राजकीय जाहिरात प्रकाशित करायची असल्यास, संबंधित पक्ष किंवा उमेदवारांनी दोन्ही तारखांच्या दोन दिवस आधी प्रमाणीकरणासाठी अर्ज सादर करावा. अशी जाहिरात प्रकाशित करण्याआधी संबंधित अर्ज समितीकडे सादर न केल्यास त्यावर कारवाई होऊ शकते.

सर्व पक्षांनी आणि उमेदवारांनी या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डीले यांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha  Rakhandar Daily Newspaper  Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# गंगापूरमध्ये महा विकास आघाडीला धक्का;डॉ.ज्ञानेश्वर निळ, संतोष जाधव,अनिल पोळ यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर मध्ये महा विकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे, ज्यावेळी डॉ. ज्ञानेश्वर निळ, संतोष जाधव आणि अनिल पोळ यांसह हजारो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या घटनांनी गंगापूर आणि आसपासच्या राजकीय वातावरणात उलाढाल निर्माण केली आहे.

सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांच्या उपस्थितीत आयोजित सभेत डॉ. निळ यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली होती. त्यानंतर, डॉ. निळ यांनी शरद पवार यांना राजीनामा दिला आणि वैजापूर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रचारसभेत शिवसेनेत प्रवेश केला.

डॉ. निळ हे पूर्वी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समिती आणि तालुक्यात कार्यरत होते. मात्र, विधानसभेच्या उमेदवारीसाठी आयात उमेदवारांची निवड केली गेली, ज्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. यामुळे गंगापूर आणि खुलताबाद मतदारसंघात महा विकास आघाडीच्या नेतृत्वाने प्रयत्न केले, पण डॉ. निळ यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, महिला, कामगार यांना न्याय दिला जात असल्यामुळे डॉ. निळ आणि इतर कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या कार्यक्रमात खासदार संदीपानजी भुमरे, आमदार रमेश बोरणारे, माजी सभापती दिलीप सिंग राजपूत, तालुका प्रमुख दिलीप निरपळ आणि इतर प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. निळ यांनी सांगितले की, २०१४ पासून राष्ट्रवादी काँग्रेसने कार्यकर्त्यांवर अन्याय केला, परंतु मुख्यमंत्री शिंदे यांच्या विकास कामांमुळे त्यांना शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी प्रेरणा मिळाली.



# बदलापूरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाण पुलावरील रस्त्याची दुरावस्था झाली आहे

**बदलापूर । प्रतिनिधी**

फमहाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आश्वासनांचा पाऊस पडत असला तरी बदलापूरकरांच्या मनात एक कायमचा प्रश्न आहे, स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाणपुलावरील रस्त्याचे काय? बदलापूरमधील पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाणपुल हा एकमेव रस्ता असून, या रस्त्याची स्थिती अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे वाहन चालवताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याने बदलापूरच्या प्रवासी वर्गात नाराजी आहे.

रस्त्यावर खड्ड्यांची संख्या जास्त झाल्यामुळे रस्ता का मृत्यूचा सापळा? अशी परिस्थिती तयार झाली आहे. पुलावरून वाहने ये-जा करत असून, डांबरीकरण उखडल्यामुळे रस्ता कधीही पुन्हा खराब होतो. हा रस्ता नगरपरिषदेच्या जुन्या कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर असून, बदलापूर पूर्व व पश्चिमेला



जोडणारा मुख्य रस्ता आहे. व्यापारी, दुकानदार, शेतकरी, शालेय विद्यार्थी आणि चाकरमान्यांना हा रस्ता जीवघेणी प्रवास करायला भाग पडतो.

काही दिवसांपूर्वी या रस्त्याचे तात्पुरते डागडुजी करण्यात आले होते, परंतु रस्त्याची स्थिती पूर्वीसारखीच आहे. दरवर्षी पावसाळ्यानंतर मलमपट्टी केली जाते, पण काही दिवसांतच पुन्हा खड्डे निर्माण होतात. महिला प्रवासी आणि रुग्णांसाठी हा रस्ता वापरणे अत्यंत कठीण ठरत आहे. खड्ड्यांमुळे अपघात होण्याचे धोके वाढले आहेत. स्थानिक नागरिक या रस्त्याची लवकर दुरुस्ती होईल अशी आशा व्यक्त करत आहेत.

# देवळीत भाजप उमेदवार राजेश बकाने यांच्या प्रचारासाठी पदयात्रा, बकानेंचा विजय निश्चितच होईल-रामदास तडस




**देवळी । प्रतिनिधी**

देवळी विधानसभा मतदारसंघात भाजप महायुतीचे उमेदवार राजेश बकाने यांच्या प्रचारासाठी रविवारी, १० नोव्हेंबर २०२४ रोजी एक भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत माजी खासदार रामदास तडस, राजेश बकाने आणि भाजपचे इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करतांना, रामदास तडस यांनी 'राजेश बकाने यांच्या विजयाने देवळीचे भविष्य उज्ज्वल होईल' असे आवाहन केले.

पदयात्रेने देवळी विधानसभा मतदारसंघात भाजपाचा जोरदार माहौल तयार केला असून, स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष सुचिता मडावी, नपचे माजी उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र मदनकर, किरण उरकांदे, राहुल चोपडा, अनिल क्षीरसागर, गोल्डी बग्गा, रवी कारोटकर, नंदू वैद्य, बंडू जोशी, प्रवीण तेलरांधे, गौरव गावंडे, शुभांगी कुर्जेकर, अंकित डेकाळे आणि निलेश कसनारे यांसह भाजपचे महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.पद्यात्रेच्या माध्यमातून राजेश बकाने यांनी देवळी मतदारसंघातील विविध गावांमध्ये जाऊन लोकांना मतदान करण्याचे आवाहन केले. विशेषत: माजी खासदार रामदास तडस आणि राजेश बकाने यांनी प्रत्येक दुकान व घरांमध्ये जाऊन मत मागण्याचा निर्णय घेतला आहे.

**रॅलीत काँग्रेसच्या २५ वर्षांच्या शासनावर टीका**


याच दिवशी, भाजपचे माजी खासदार सुरेश वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली अल्लीपूर व परिसरात प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीत, काँग्रेसच्या २५ वर्षांच्या शासनात देवळी मतदारसंघाचा विकास झालेला नाही, याचा मुद्दा पुढे आणण्यात आला. सुरेश वाघमारे यांनी भाजप उमेदवार राजेश बकाने यांच्या नेतृत्वाखाली, मतदारसंघाच्या विकासासाठी पावले उचलली जात असल्याचे स्पष्ट केले.राजेश बकाने यांनी आपल्या प्रचाराच्या माध्यमातून मतदारांमध्ये एकजूट आणली असून, आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांच्या विजयाची आशा व्यक्त केली जात आहे.

# शिंगी ते दलीत वस्ती रस्त्यात अडकली भाडोत्री कार्यकर्त्यांची बस

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील शिंगी गावात एका अपक्ष उमेदवाराच्या गावभेटीदरम्यान गोंधळाचा प्रसंग घडला. या भेटीसाठी बाहेरगावाहून महिला कार्यकर्त्यांना आणून शिंगी गावात रॅली काढली जात होती. रॅली दरम्यान शिंगी गाव ते दलीत वस्ती रस्त्यावर खड्ड्यांमुळे बस अडकली.

शिंगी गाव हा आमदार रमेश बोरणारे यांच्या मतदारसंघाचा भाग आहे. बोरणारे यांनी २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी जाहीर केले होते की, जर गावात डांबरी रस्ता नसेल, तर मी त्या गावात मत मागायला जाणार नाही. परंतु, या घोषणेनंतरही शिंगी गावातील रस्त्याची स्थिती सुधारलेली नाही. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे बस चालवणाऱ्याला खड्ड्याचा अंदाज आला नाही आणि बस खड्ड्यात अडकली. या कारणामुळे बसच्या चालकाला तासभर अडचणीत सापडावे लागले. अखेर एका शेतकऱ्याच्या ट्रॅक्टरच्या साहाय्याने बस बाहेर काढण्यात आली.गावकऱ्यांनी रस्त्याच्या दुरावस्थेविषयी नाराजी व्यक्त केली असून, यावरून आरोप केले आहेत की, प्रशासनाने फक्त घोषणा केल्या आहेत, पण गंगापूर व वैजापूर मतदारसंघातील रस्त्यांचा गतीने विकास होवू शकलेला नाही.



# साकूर येथील ज्वेलर्स दुकानात भरदिवसा घातलेल्या दरोड्यातील दोघे जण पोलिस आणि ग्रामस्थांच्या मदतीने पकडले

**संगमनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील साकूर येथील कान्हा ज्वेलर्स दुकानात काल दुपारी पाच दरोडेखोरांनी बंदूकांचा धाक दाखवत सोन्याचे दागिने लुटून घेतले. ही घटना भरदिवसा आणि गजबजलेल्या ठिकाणी घडल्याने साकूरमध्ये एकच खळबळ उडाली होती. दरोडेखोरांनी दुकानात घुसून कामगाराला धमकावले आणि सोन्याचे दागिने लुटून घेतले. त्यानंतर ते पळून जात असताना फायरिंग केली, ज्यामुळे अधिक गोंधळ उडाला.



घटनेची माहिती मिळताच, स्थानिक पोलिस आणि नागरिक घटनास्थळी धावले. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हा थरार कैद झाला असून, पोलिसांनी पाच दरोडेखोरांच्या शोधासाठी पथकांची रचना केली. यामध्ये दोन दरोडेखोरांना पारनेर तालुक्यातील कुरणवाडी - जांभुळवाडी परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे. यापैकी एक दरोडेखोर बारामतीचा असल्याची माहिती समोर आली आहे.

संदेश मिळाल्यावर, पोलिसांनी वासुंदे (ता. पारनेर) शिवारात नाकाबंदी केली आणि दोन दरोडेखोरांना पहाटेच्या सुमारास पकडले. एका दरोडेखोराला डोंगरात लपून बसलेला असताना ग्रामस्थ आणि पोलिसांच्या मदतीने त्याला ताब्यात घेतले. दरोडेखोरांनी दुचाकी सोडून डोंगरातून पळ काढला, पण अखेर ते पकडले गेले. उर्वरित तीन दरोडेखोरांचा शोध सुरू आहे.

साकूर येथील कान्हा ज्वेलर्सच्या दुकानात लुटलेल्या सोन्याच्या दागिन्यांचे वजन अर्धा किलो होते. याप्रकरणी अधिक तपास सुरू असून, पोलिसांनी आरोपींच्या मागावर मोठे पथक पाठवले आहे.

# महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ भाजपची यंत्रणा सक्रिय

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीने शहरात जोरदार प्रचार अभियान सुरू केले आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांनी प्रभाग ८ मधील शिवाजीनगर आणि कल्याण रोड परिसरात प्रचार रॅली काढली, ज्यात महायुती सरकारच्या विकासकामांची आठवण मतदारांना करून देण्यात आली. या प्रचार रॅलीत भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ड. अभय आगरकर, ज्येष्ठ भाजप नेते सुनील रामदासी, जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी आणि इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपने महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी विशेष यंत्रणा उभी केली आहे, ज्यामुळे जनतेसोबत संवाद साधून प्रचाराची तीव्रता वाढवली जात आहे.




ड. अभय आगरकर यांनी सांगितले की, भाजपच्या जनसंपर्कामुळे महायुतीच्या उमेदवाराला विजय मिळवण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे, महायुती सरकारने शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. सविता कोटा यांनी महिलांच्या सन्मानासाठी महायुती सरकारने केलेल्या कामाचा उल्लेख केला आणि मतदारांना मतदानाच्या माध्यमातून त्याला परतफेड करण्याचे आवाहन केले. दत्ता गाडळकर यांनी महायुतीच्या उमेदवाराला सर्व वर्गातून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले, तसेच शेतकरी आणि कामगार वर्गाच्या कल्याणासाठी महायुती सरकारने घेतलेले उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले. या रॅलीमध्ये भाजपचे अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते, आणि ते आगामी निवडणुकीत आ. संग्राम जगताप यांचा विजय सुनिश्चित करण्यासाठी सज्ज आहेत.

# महायुती सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार-राधाकृष्ण विखे पाटील

**राहुरी । प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी विविध संवेदनशील निर्णय घेतले आहेत. नैसर्गिक संकटात झालेल्या नुकसानीवर राज्य सरकारने बारा हजार कोटी रुपयांची मदत दिली आहे. पुढील काळात महायुती सरकार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीही निर्णय घेणार असल्याची माहिती महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

नांदूर, रांजणखोल आणि ममदापूर येथील महायुतीच्या प्रचार सभेत विखे पाटील यांनी मतदारांशी संवाद साधला आणि महायुतीने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. त्यांनी आघाडी सरकारवर आरोप करताना म्हटले की, आघाडी सरकारने राज्याला वाऱ्यावर सोडले होते. महायुतीने योजनांची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर आघाडीच्या नेत्यांना जाग आली आहे, परंतु त्यांच्या



आश्वासनांवर जनतेचा विश्वास नाही.

विखे पाटील यांनी महाविकास आघाडीच्या योजनांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत सांगितले की, महायुतीने शेतकऱ्यांसाठी योजनांची अंमलबजावणी करून त्याचे लाभ दिले आहेत, ज्यामुळे बहिणींना आमच्या योजनेची खात्री आहे. विधानसभा निवडणुकीत सर्व बहिणी महायुतीच्या पाठीशी उभ्या राहतील.

महाविकास आघाडीच्या नेत्यांवर टीका करत विखे पाटील म्हणाले, आघाडीचे नेते केवळ बोलण्यापुरते तुमच्याकडे येत आहेत. त्यांच्याकडे विकासाचा कोणताही अजेंडा नाही.

# रासपचे संगमनेर तालुकाध्यक्ष सोपान तांबडे काँग्रेसमध्ये प्रवेश

**संगमनेर । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाने देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठा विकास केला आहे आणि राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव तसेच संविधानाच्या संरक्षणाची शपथ घेतलेला हा पक्ष देशाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे काँग्रेस विधिमंडळाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यातील राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष सोपान तांबडे आणि त्यांचे सहकारी काँग्रेसमध्ये जाहीरपणे प्रवेश केले.



याप्रसंगी माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी सोपान तांबडे यांचा सत्कार केला आणि त्यांना पक्षात स्वागत केले. तांबडे यांच्यासह डिग्रस गावचे युवा नेते सोमनाथ वारे यांच्यासह आदिवासी युवकांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

आमदार थोरात म्हणाले, काँग्रेस पक्षाच्या पाठीमागे मोठा त्याग व बलिदान आहे. काँग्रेसचे देशाच्या विकासात अत्यंत महत्वाचे योगदान आहे आणि महाविकास आघाडीवर लोकांचा विश्वास वाढला आहे. काँग्रेस नेहमीच गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठी काम करत आहे.सोपान तांबडे यांनी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचे कौतुक करत सांगितले, आमदार बाळासाहेब थोरात यांचे नेतृत्व संगमनेर तालुक्याच्या विकासासाठी अत्यंत प्रभावी आहे. त्यांच्यामुळे संगमनेर तालुक्याला राज्यात सन्मान मिळाला आहे. यापुढे काँग्रेसच्या माध्यमातून आम्ही जनविकासाची अधिक कामे करू.या प्रवेशप्रसंगी एकनाथ बिडगर, बाळासाहेब वावरे यांच्यासह रासप पक्षाचे अनेक कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सामील झाले.